

# डॉ. गिरीश मोहन देसाई

## आव्हानांवर मात करणारा प्रगल्भ शिक्षणदूत

**परिचय**

**नाव : डॉ. गिरीश मोहन देसाई**

**पदनाम : कार्यकारी संचालक, पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट अँड नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ.**

**सचिव : शंकरराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट आणि स्वतंत्र संचालक : फिडेल सॉफ्टटेक लिमिटेड**

**जन्म : २० मार्च १९७२**

'करि मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे' हे शालेय पाठ्यपुस्तकातील अभिवचन जीवनप्रमाण मानून शैक्षणिक विकासाच्या कक्षा रुंदावण्यासाठी समर्पित भावनेने योगदान देणाऱ्या एका मुत्सद्दी व हरहुन्नरी शिक्षणयात्रीची ही कथा आहे, ज्याने पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मनाचे स्थान मिळवून दिले आहे. अभिनवतेचा निरंतर पाठलाग, अखंड परिश्रम आणि आव्हानांना प्रति-आव्हान देत शैक्षणिक विकासाच्या निरभ्र अवकाशात विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना सामर्थ्याचे पंख बहाल करणाऱ्या या विजिगीषु शिक्षणयात्रीचे नाव आहे डॉ. गिरीश मोहन देसाई. पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टसह पुण्यातील इतर महत्त्वाच्या शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून एक नवी शैक्षणिक क्रांती घडवून आणणाऱ्या या शिक्षणयात्रीच्या आव्हानांनी भरलेल्या संघर्षमय जीवनप्रवासाविषयी.

डॉ. गिरीश मोहन देसाई यांचा जन्म २० मार्च १९७२ साली जमखंडी (कर्नाटक) येथे झाला. जमखंडी हे गिरीश देसाई यांचे आजोळ. देसाई परिवार मूळचा मुधोळ संस्थानात वास्तव्यास होता. डॉ. गिरीश देसाई यांचे वडील श्री. मोहन देसाई यांनी कर्नाटक राज्यातील हुबळी येथे स्थापित बुमरेड्डी महाविद्यालयातून मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी घेतली होती, तर आजोबा हे स्वातंत्र्यपूर्व काळातील एक प्रख्यात एमबीबीएस डॉक्टर होते. जॉर्ज मेडिकल कॉलेजमधून त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले होते. मात्र, इंग्रजांच्या आस्थापनांमध्ये नोकरी न करता त्यांनी स्वदेशी बाणा जपत खाजगी प्रॅक्टिसच्या माध्यमातून रुग्णसेवा केली. पुढे वडील श्री. मोहन देसाई यांनी महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागात कनिष्ठ अभियंता म्हणून नोकरी मिळवली. स्वातंत्र्यानंतर कोयना धरणाच्या निर्मितीची मुहूर्तमेढ रोवली गेली, तेव्हा या प्रोजेक्टवर काम करण्याची संधी मोहन देसाई यांना मिळाली. त्यामुळे देसाई परिवार महाराष्ट्रातच स्थायिक झाला. पुढे हरितक्रांतीचे वारे राज्यभर वेगाने वाहू लागले. धरणांची निर्मिती करून ओलिताखालील क्षेत्रामध्ये वाढ करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला. त्यानुसार



मोहन देसाई यांची प्रशासकीय सेवेत बदली होत गेली. कालपरत्वे मोहन व सुशिला देसाई यांच्या संसारवेलीवर मदन, गिरीश व मिलिंद यांच्या रूपाने तीन फुले उमलली.

वडिलांची ठाणे जिल्ह्यात भातसानगर डॅमच्या कामासाठी बदली झालेली असल्यामुळे गिरीश देसाई यांचे प्राथमिक शिक्षण ठाणे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. त्यानंतर वडिलांची सांगली येथे बदली झाली. तेथे श्रीराम रामदयाल मालू हायस्कूलमध्ये इयत्ता सातवीपर्यंत त्यांनी शिक्षण घेतले. त्यानंतर वडिलांची बदली पुण्याला झाल्याने गिरीश देसाई यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण पुण्याच्या मॉडर्न हायस्कूलमधून झाले. दहावीनंतर मॉर्डन कॉलेजमध्येच विज्ञान शाखेला प्रवेश घेत त्यांनी बारावीची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण केली. बारावीनंतर काय करायचे, करिअरची कोणती वाट निवडायची, याबाबत तेव्हा फारसे प्रबोधन नव्हते. परंतु, घरचा उत्तम शैक्षणिक वारसा गिरीश देसाई यांना लाभल्याने व अभियांत्रिकीची त्यांना आवड असल्याने भारती विद्यापीठातून त्यांनी सन १९९३ मध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंगची पदवी संपादित केली. पुढे याच विषयात त्यांनी डॉक्टरेटही मिळवली.

इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत असताना महाविद्यालयीन जीवनात डॉ. गिरीश देसाई यांनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवत व्यक्तिमत्त्व विकासाला विशेष प्राधान्य दिले. सफाईदार व मुद्देसूद वक्तृत्व आणि सातत्यपूर्ण संतुलित अभ्यासाला दिलेले प्राधान्य, यामुळे डॉ. गिरीश देसाई यांना एक आश्वासक दृष्टिकोन महाविद्यालयीन जीवनापासूनच लाभला होता. सर्वसामान्य कुटुंबांतील मुले मित्र म्हणून लाभल्याने मोहक आयुष्याचे आकर्षण गिरीश देसाई यांना कधीच लागले नाही. उलट कष्ट केल्याशिवाय आपल्याला यशाची फळे चाखता येणार नाहीत, हे सूत्र त्यांनी विद्यार्थीदशेपासूनच आरंभले होते. इंजिनिअरिंग झाल्यावर पुणे औद्योगिक वसाहतीतील फुजित्सु आयसीआयएम कंपनीत वेंडर डेव्हलपमेंट अँड पर्चेस डिपार्टमेंटमध्ये काम करण्याची संधी मिळाली. शैक्षणिक कालावधीत विविध मशिनरींचे कार्यान्वयन करण्याचे कौशल्य डॉ. गिरीश देसाई यांनी आत्मसात केल्याने एक कुशल इंजिनिअर म्हणून कंपनी व्यवस्थापनाने गिरीश देसाई यांचा सन्मान केला. मात्र, पुढे काही कारणाने फुजित्सु कंपनीने उत्पादन विभाग बंद करण्याचा निर्णय घेतला.

दुसऱ्या नोकरीच्या शोधात असतानाच डॉ. गिरीश देसाई यांनी पिंपरी–चिंचवड पॉलिटेक्निक कॉलेजला लेक्चरर म्हणून नोकरी करण्यास सुरुवात केली. परंतु, काही दिवसानंतर रांजणगाव एमआयडीसीतील ग्रो वेल कंपनी पूर्वीच्या कंपनीचे सहकारी राजेश डुब्बेवार यांच्या सांगण्यावरून जॉईन केली. ही कंपनी नामांकित घड्याळ उत्पादक कंपन्यांसाठी आवश्यक उत्पादनांची निर्मिती करत असे. स्वित्झरलँड बेस्ड कंपनी असलेल्या ग्रो वेलमध्ये वरिष्ठ खरेदी अधिकारी म्हणून काम करत असताना मार्केटिंग व विपणन या क्षेत्राचा चांगला अभ्यास डॉ. गिरीश देसाई यांना करता आला. यानिमित्ताने देशभरातील विविध महत्त्वपूर्ण शहरांमध्ये त्यांना नोकरीनिमित्त दौरा करण्याची संधी मिळाली. परंतु, आर्थिक अनियमिततेमुळे ही कंपनी बंद पडली. हा काळ सन १९९९ चा होता. जागतिक बाजारपेठेत तेव्हा मंदीची लाट असल्याने नवी नोकरी मिळण्याची शक्यताही धूसर झाली होती. नोकरीतील अस्थिरतेमुळे गिरीश देसाईसुद्धा काहीसे नाराज झाले होते.

विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत सणावारांनिमित्त ग्रिटिंग कार्ड तसेच इतर भेटवस्तू देण्याची प्रथा होती. त्या वेळी गिरीश देसाई यांच्या ओळखीचे खन्ना नामक व्यापारी टाटा डोनेली कंपनीमार्फत उत्पादित ग्रिटिंग कार्ड व इतर भेटवस्तूंची विक्री करत असत. त्यांच्या ओळखीने

डॉ. गिरीश देसाई यांनी टाटा डोनेली या कंपनीची डिस्ट्रिब्युटरशीप घेतली व व्यवसायाला सुरुवात केली. पुणे जिल्ह्यातील जवळपास सगळ्याच एमआयडीसींची डॉ. गिरीश देसाई यांना ओळख असल्याने अनेक कॉर्पोरेट क्लाइंट्सला टाटा डोनेलीच्या वस्तू विक्री करत लाखो रुपयांची उलाढाल डॉ. गिरीश देसाई यांनी केली. त्यामुळे दुसरा नवा उद्योग सुरु करण्यासाठी डॉ. गिरीश देसाई यांच्या हातात भांडवल तयार झाले होते. त्यातून त्यांनी आपल्या गाळ्याच्या शेजारीच २ लाख ४० हजार रुपयांना आणखी एक गाळा खरेदी करत तेथे सायबर कॅफे सुरू केला. सोबत एसटीडी, आयएसडी व पीसीओचीही सुविधा कार्यान्वित केली. औंध परिसरात स्थानिक, भारतीय तसेच विदेशी विद्यार्थ्यांचा भरणा

**व्यवसायातही मिळवले यश**

नोकरीची नवीन संधी नसल्यामुळे आणि स्वतःचा व्यवसाय करावा म्हणून डॉ. गिरीश देसाई यांनी बंधूंच्या सहकार्याने गाळा घेतला. बंधूंना ऑटोमोबाईल सेक्टरचा अनुभव असल्याने सुरुवातीला ऑटोमोबाईल सर्व्हिस सेंटर सुरु केले. परंतु, परिसरात वाढत जाणारी नागरीवस्ती व ग्राहकांची गरज लक्षात घेत त्यांनी पॅकेट्समध्ये भाजी पुरविण्याचा ऑर्डर घेऊन त्या ठिकाणावरून डिलिव्हरी सुरु केली. ही संकल्पना पुढे फारच यशस्वी झाली. लोकांसाठी ही संकल्पना अभिनव होती. मात्र, मन्युष्यबळ कमी असल्यामुळे हा व्यवसाय त्यांनी बंद केला व नव्या व्यवसायाची वाट निवडली.



अधिक असल्याने हा व्यवसायही अल्पावधीत यशस्वी ठरला.

छोट्यामोठ्या व्यवसायांतून डॉ. गिरीश देसाई उत्तम प्रगती साधून होते. अशातच घरात लग्नाची बोलणी सुरू झाल्याने आपण आपल्या शिक्षणाला अनुरूप शाश्वत उत्पन्न देणारी नोकरीही केली पाहिजे, या विचारातून डॉ. गिरीश देसाई यांनी पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिगमध्ये लेक्चरर म्हणून २ ऑक्टोबर २००२ पासून नोकरी करण्यास सुरुवात केली. त्याआधी डॉ. गिरीश देसाई यांचा राजकोट येथील वीणा यांच्याशी विवाह झाला. डॉ. गिरीश देसाई यांचा धडपड्या स्वभाव असल्याने अध्यापनाव्यतिरिक्त इतरही आश्वासक संकल्पनांची मुहूर्तमेढ त्यांनी महाविद्यालयात रोवली. डॉ. गिरीश देसाई यांच्या अभिनव संकल्पनांमुळे संचालक मंडळाने त्यांच्यावर विश्वास दर्शवत संस्थेच्या आस्थापनाविषयक विषयांची जबाबदारी सोपवली.

डॉ. गिरीश देसाई यांनी आपल्या प्रारंभीच्या सेवाकाळापासूनच संचालक मंडळापुढे पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या विस्ताराचा रोडमॅप मांडण्यास सुरुवात केली होती. त्यासाठी मोठा प्रशासकीय पाठपुरावा करावा लागेल, याची जाणीव गिरीश देसाई यांना होती. ही जबाबदारीही त्यांनी स्वत:कडे घेतली. त्यावेळी नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ संस्थेच्या प्रतिष्ठीत संचालकांपैकी एक असलेले श्री. कृष्णराव भेगडे यांनी त्यांच्या मालकीची तीस एकर जागा पिंपरी-चिंचवड ट्रस्टला लीज तत्त्वावर दिली. मात्र, एआयसीटीईने लीज नको, सातबारा ट्रस्टच्या नावाने असायला हवा, अशी अट घातल्याने विस्ताराच्या प्रारंभीच मोठे आव्हान उभे राहिले. परंतु, समाजशील व्यक्तिमत्त्व असलेल्या कृष्णराव भेगडे यांनी ही अटही मान्य करत सोमाटणे फाट्याजवळील जमीन ट्रस्टला दिली व इंजिनिअरिंग कॉलेजच्या विस्ताराला मंजुरी मिळाली. पहिल्या वर्षी १०२ व दुसऱ्या वर्षी २४० प्रवेश करत पिंपरी-चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनीरिंग



(PCCOE) वेगाने आपली शैक्षणिक प्रगती साधू लागले. मात्र, मूळ जागेत कॉलेज उभारण्यासाठी एआयसीटीईने तगादा लावत प्रवेशांच्या संख्येवर मर्यादा आणण्यास सुरुवात केली.

एआयसीटीईकडून होत असलेली कार्यवाही आणि त्याचा शैक्षणिक विकासावर होणारा परिणाम लक्षात घेता डॉ. गिरीश देसाई मैदानात उतरले. त्या वेळी पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष असलेल्या श्री. शंकरराव पाटील (भाऊ) यांनी प्राधिकरणाची जागा मिळवत डॉ. गिरीश देसाई यांच्या प्रयत्नांना पाठबळ दिले. एआयसीटीईकडे डॉ. गिरीश देसाई यांनी सातत्याने पाठपुरावा करत प्रवेश मर्यादेवरची कार्यवाही शिथिल करण्यात यश मिळवले. त्यासाठी २०-२० दिवस दिल्लीत मुक्काम करणे, अधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेणे असे प्रकार नित्याचेच झाले होते. इकडे कॉलेजच्या दुसऱ्या इमारतींचे बांधकामही सुरू झाल्याने एआयसीटीईने प्रवेश कोटा पुन्हा पूर्ववत केला. पुढे तो २४० पासून ७०० पर्यंत पोहचला. यादरम्यान, सर्व कार्यालयांत डॉ. गिरीश देसाई यांचे चांगले संबंध निर्माण झाले होते. त्याद्वारे विविध नवीन कोर्सेसही शिकवण्यात येऊ लागले. तंत्रशिक्षणातील ही विविधता पुण्याच्या शैक्षणिक विकासाला कलाटणी देणारी ठरली. सातत्याने नवं काहितरी करण्याची मानसिकता बाळगणाऱ्या डॉ. गिरीश देसाई यांनी काळाच्या पुढे विचार करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे शैक्षणिक क्षेत्रातील वेगळेपण दिवसेंदिवस ठळकपणे अधोरेखित होऊ लागले होते.

नावीन्यपूर्ण अभ्यासक्रमांचा समावेश करत संस्थेच्या शैक्षणिक विकासाच्या कक्षा रुंदावत नेण्याला गिरीश देसाई यांनी प्राधान्य दिले होते. त्यातूनच पुढे सन २००९ मध्ये एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेंजमेंट या एमबीए कॉलेजची स्थापना करण्यात आली. याचदरम्यान, रावेत येथे संस्थेच्या जागेत सीबीएसई स्कूलला मान्यता मिळाली. तेथे एस. बी. पाटील पब्लिक स्कूलची स्थापना करण्यात आली. या शाळेला परिसरातील विद्यार्थी व पालकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. आजमितीस या शाळेत साडेतीन हजारांहून अधिक विद्यार्थी शैक्षणिक धडे गिरवत आहेत.

पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या शैक्षणिक विकासासाठी केलेले प्रयत्न आणि सातत्याने नवं काहीतरी करण्यासाठी कार्यरत असलेल्या डॉ. गिरीश देसाई यांच्या कामाचा अंदाज संस्थाचालकांना एव्हाना पुरेपूर आला होता. या सर्व काळात त्यांना पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या सर्वच संचालक मंडळ अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा श्रीमती पद्माताई भोसले, सेक्रेटरी श्री. विठ्ठल काळभोर, खजिनदार श्री. शांताराम गराडे, ट्रस्टी श्री. हर्षवर्धन पाटील, ट्रस्टी स्व. श्री. भाईजान काझी यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व पाठबळ मिळाले.

त्यांच्या या कार्याची दखल घेत तत्कालीन सहकारमंत्री श्री. हर्षवर्धन पाटील यांनी इंदापुरातही इंजिनिअरिंग महाविद्यालय सुरू करण्याची कल्पना गिरीश देसाई यांना सांगितली व त्यासाठी आवश्यक सर्व कार्यवाही आपण आपले स्तरावरून करावी, असे कामाचे पूर्ण स्वातंत्र्यही दिले. हर्षवर्धन पाटील यांनी टाकलेला विश्वास सार्थ ठरवत डॉ. गिरीश देसाई यांनी इंदापुरात तळ ठोकत ही जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शन व संनियंत्रणाखाली सन २०१३ मध्ये इंदापुरात इंजिनिअरिंग कॉलेज कार्यान्वित झाले. या कालावधीत गिरीश देसाई यांचा प्रशासकीय कामांमुळे मंत्रालयाशी चांगला संपर्क निर्माण झाला. अनेक ओळखी वाढल्या. त्याचा फायदा पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या वैभवशाली वाटचालीसाठी यथोचित झाला.

डॉ. गिरीश देसाई यांनी आपल्या कल्पक नेतृत्वातून पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट अंतर्गत सन २०१४ मध्ये एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अ‍ॅन्ड डिझाईन व इतर विविध अभ्यासक्रमांचे अध्यासन सुरू करत पीसीईटीचे नाव भारतभर नेण्यास सुरुवात केली. रावेतला आणखी एक इंजिनिअरिंग कॉलेज बारा कोटी रुपये खर्च करून बांधण्यात आले. मात्र, याचदरम्यान एआयसीटीईने या कॉलेजसह महाराष्ट्रातील ९ कॉलेज अतिरिक्त ठरवल्याने मोठे संकट निर्माण झाले. मात्र, अशाही अवस्थेत हार न मानता डॉ. गिरीश देसाई यांनी रातोरात अ‍ॅड. अंतुरकर यांच्या सहकार्याने रिट पिटीशन दाखल करत एआयसीटीईला पुनर्विचार करण्यास भाग पाडले. यादरम्यान पायाला फ्रॅक्चर असतानाही डॉ. गिरीश देसाई यांनी हायकोर्टाच्या पायऱ्या झिजवल्या, पण हार मानली नाही. दुसरीकडे कृष्णराव भेगडे यांच्या तळेगावातील इंजिनिअरींग कॉलेजला ग्लानी आली होती. या कॉलेजला गतिमान करण्याची जबाबदारी कृष्णराव भेगडे यांनी डॉ. गिरीश देसाई यांच्यावर सोपवली. त्यांनी प्रशासकीय कारभारातील चुकांचे उच्चाटन करत अल्पावधीतच हे कॉलेज पूर्वपदावर आणले. नूतन महाराष्ट्र विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कृष्णराव भेगडे यांनी कार्यकारी संचालकपदाचा मान डॉ. गिरीश देसाई यांना देत कॉलेजची पुढील वाटचाल आपल्या मार्गदर्शनाखाली व्हावी, अशी इच्छा व्यक्त केली. त्यानुसार डॉ. गिरीश देसाई यांनी पॉलिटेक्निक कॉलेज बंद करून त्याऐवजी नूतन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड रिसर्च या नावाने एआयसीटीईतून मान्यता मिळवली व ४०० ते ५०० विद्यार्थी संख्येचे ते कॉलेज एकाचवेळी चार ते पाच हजार विद्यार्थ्यांना शिक्षण




देऊ लागले. ही किमया केवळ गिरीश देसाई यांच्या कल्पक नेतृत्व व विजिगीषु वृत्तीमुळे घडली होती. या सर्व कामात माजी आमदार कृष्णराव भेगडे, अध्यक्ष श्री. संजय (बाळा) भेगडे, उपाध्यक्ष श्री. गणेश खांडगे, सचिव श्री. संतोष खांडगे, सहसचिव श्री. नंदकुमार शेलार व खजिनदार श्री. राजेश म्हस्के यांचे देखील सहकार्य लाभले.

शंकरराव पाटील चॅरीटेबल ट्रस्टच्या श्रीमती पद्माताई भोसले या अध्यक्षा, गिरीश देसाई सेक्रेटरी, तुषार रांजणकर खजिनदार, अरविंद गारटकर हे सर्व या विविध पदांचे पदाधिकारी असून, संस्थेची जबाबदारी सगळे अतिशय समर्थपणे सांभाळत आहेत.

सातत्याने नवं काहितरी शिकण्याची उमेद पहिल्यापासूनच राहिल्याने डॉ. गिरीश देसाई यांनी शैक्षणिक विकासासाठी विविध देशांचे दौरे केले. अनेक परदेशी विद्यापीठांचा त्यांनी अभ्यास केला. त्यांच्याशी पीसीईटीशी संलग्नता निर्माण केली. प्रतापराव पवार यांच्या एज्युकॉन या उपक्रमातूनही डॉ. गिरीश देसाई यांना खूप काही शिकायला मिळाले. यातूनच पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटीची संकल्पना गिरीश देसाई यांनी संचालक मंडळापुढे मांडली. त्यासाठी साते या गावाजवळ सुरुवातीला १० व नंतर १९ अशी २९ एकर जागा खरेदी करत युनिवर्सिटीचे बांधकाम सुरू झाले व २०२२ ला पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटीला मान्यता मिळाली. या विद्यापीठाची मान्यता मिळण्याच्या अगोदरपासूनच देशविदेशात डॉ. गिरीश देसाई यांनी विद्यापीठाचे मार्केटिंग व ब्रँडिंग करण्यावर भर दिला होता. त्यामुळे अल्पावधीतच विद्यापीठाचे नाव सर्वदूर पोहोचले. नव्याने स्थापित खाजगी विद्यापीठात पहिल्याच वर्षी १२०० व दुसऱ्या वर्षी २००० हून अधिक अ‍ॅडमिशन करण्याची किमया पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटीने गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली साधली होती. हा शैक्षणिक क्षेत्रातील एक विक्रमच मानला जातो. शैक्षणिक विकासाची हीच परंपरा अविरत जोपासणारी व केजी टू

पीएच.डी. पर्यंतचे शिक्षण देणारी–देशातील पहिल्या पाच खाजगी विद्यापीठांमध्ये पिंपरी–चिंचवड युनिव्हर्सिटी गणली जाते.

**प्लेसमेंटसाठी स्वतंत्र टीम**

पीसीईटीतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हातात शिक्षण पूर्ण होण्याआधीच जॉबचे पत्र देण्यासाठी व्यवस्थापन मंडळाने डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शन व संनियंत्रणाखाली एक स्वतंत्र टीम गठीत केली आहे. या समितीच्या माध्यमातून उद्योजकांशी संपर्क, त्यांच्या गरजा व आवश्यक मनुष्यबळ यांची पूर्तता करण्यासाठी नियोजन केले जाते. त्यानुसार विद्यार्थी घडविला जातो. त्यामुळेच पीसीईटीच्या प्लेसमेंटची टक्केवारी इतर विद्यापीठांपेक्षा उजवी ठरते. उत्तम अध्यापन व सृजनशील वातावरणात विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाची संधी उपलब्ध करून देत प्लेसमेंटमध्ये आपला नावलौकीक उंचावत नेला आहे. अंतर्गत बी. टेक. हा अभ्यासक्रम मराठीतून शिकवणारे पहिले कॉलेज म्हणून सन्मान झाला आहे. या कार्याची माहिती घेण्यासाठी स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदी उपस्थित राहणार असून, त्यादृष्टीने कार्यवाही आरंभण्यात आली आहे.



शैक्षणिक संस्थाच्या विकासासाठी काम करत असताना आपली स्वत:चीही एक संस्था असावी, असा विचार डॉ. गिरीश देसाई यांच्या मनात कधीच आला नाही. उलट आपण कार्यरत असलेल्या संस्थांना ऊर्जितावस्था देऊन विद्यार्थी हित साधण्यास त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. संस्थानिर्मितीतून पैसे कमविण्याला नाही तर संस्था बळकटीकरणातून शैक्षणिक सेवेला त्यांनी आपल्या जीवनात महत्त्व दिले. पैशांची अभिलाषा कालही नव्हती व आजही नाही. केवळ विद्यार्थी घडला पाहिजे, पुढे गेला पाहिजे हेच व्हिजन डोळ्यासमोर ठेवून आजवर कार्य केल्याचे गिरीश देसाई सांगतात. शैक्षणिक क्षेत्रातील विविध संस्थांमध्ये कार्यरत प्रतापराव पवार, पी. डी. पाटील, कुलपती डी. वाय. पाटील विद्यापीठ, भरत अग्रवाल, कृष्णराव भेगडे, माजी आमदार हर्षवर्धन पाटील माजी सदस्य, महाराष्ट्र विधानसभा आदींकडून मिळणारा मानसन्मान व विश्वास हीच आयुष्यातील सर्वात मोठी जमापुंजी आणि पुरस्कार असल्याचे गिरीश देसाई सांगतात.

पुण्यातील आकुर्डी येथील कॅम्पसमध्ये सुमारे ७,२०० विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, एमबीए, एमसीए आणि पीजीडीएम यासारख्या विशेष अभ्यासक्रमांमध्ये व्यावसायिक आणि उत्कृष्ट प्रशिक्षकांद्वारे प्रशिक्षण दिले जात आहे. रावेत येथील कॅम्पसमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयातील १,२०० पदवीधर, कनिष्ठ महाविद्यालयातील सुमारे ८०० विद्यार्थी आणि पब्लिक स्कूलमधील अंदाजे ४,००० विद्यार्थी, असे एकूण १२,७०० विद्यार्थी आहेत. भविष्यात पिंपरी–चिंचवड विद्यापीठ खाजगी क्षेत्रातील सर्वात मोठे विद्यापीठ म्हणून नावारूपाला आणण्याचा माझा मानस असल्याचे डॉ. गिरीश देसाई सांगतात.

शैक्षणिक क्षेत्रात कार्यमग्न असलेल्या डॉ. गिरीश देसाई यांना वयाच्या अवघ्या ३७ व्या वर्षी पिंपरी–चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक होण्याची संधी मिळाली. या उपलब्धीनंतर डॉ. गिरीश देसाई यांनी ट्रस्टच्या शैक्षणिक विकासाच्या कार्यात स्वत:ला झोकून दिले. त्यासाठी पत्नी वीणा देसाई यांची उत्तम साथ डॉ. गिरीश देसाई यांना लाभली. पत्नीच्या सहकार्य व समर्पणाशिवाय मला एज्युकेशन सेक्टरमध्ये नवे माईलस्टोन सेट करणे शक्यच नव्हते, अशी प्रांजळ

कबुली डॉ. गिरीश देसाई देतात. वीणा देसाई या आंबेडकर विद्यापीठ आग्रा येथून बी.एस्सी. पदवीधर आहेत. मात्र, मुलांच्या शैक्षणिक प्रगतीत पत्नीचा वाटा मोठा असल्याचे डॉ. गिरीश देसाई सांगतात. मुलगा वरुण देसाई हा पीसीसीओई मध्ये सध्या सिव्हील इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षाला असून, मुलगी श्वेता देसाई हिचे बारावीचे शिक्षण विज्ञान शाखेतून पूर्ण झाले आहे. मेडीकलसाठी नीट परीक्षेत ती उत्तीर्ण झाली असून भारतातील मेडीकल कॉलेजमध्ये तिला प्रवेश मिळेल. दोन्ही मुलांचे शिक्षण पिंपरी–चिंचवड एज्युकेशन ट्रस्टमधूनच झाले आहे.

महाराष्ट्र एज्युकेशन आयकॉन्स २०२५ या सोळ्यात "Visionary Academic Leadership Award" हा सन्मान मा. श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते डॉ. गिरीश देसाई यांना प्रदान करण्यात आला. ही अत्यंत अभिमानाची बाब आहे. महाराष्ट्राच्या शैक्षणिक धोरणाच्या समृद्धीमध्ये मोलाचे योगदान देण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

डॉ. गिरीश देसाई यांचे वडीलबंधू मदन देसाई यांनी ऑटोमोबाईल डिप्लोमा करून व्यवसायात आपला जम बसविला आहे, तर कनिष्ठ बंधू मिलिंद देसाई हे डेन्टिस्ट असून, तेही आपल्या व्यवसायात कार्यमग्न आहेत. तीन संस्थांवर संचालक म्हणून कार्यरत असलेले डॉ. गिरीश देसाई हे फिडेल सॉफ्टटेक लिमिटेड या कंपनीचेही डायरेक्टर आहेत. आतापर्यंतच्या आयुष्यात शैक्षणिक क्षेत्रात मोठमोठी कामे करून आपण समाजाच्या उपयोगी पडलो, यातच जगण्याचे सर्वात मोठे समाधान असल्याचे डॉ. गिरीश देसाई सांगतात. सामाजिक दायित्वाचा हा कार्यप्रवाह असाच पुढे निरंतर सुरू राहो, या अपेक्षेसह भविष्यात आणखी शाश्वत व आश्वासक कार्य करण्याचा मानस डॉ. गिरीश मोहन देसाई व्यक्त करतात.

■